दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २४९ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.२० जून २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

Scan QR code to visit... Epaper Portal

## विधानसभेतही मराठा–ओबीसी आमनेसामने ?:जरांगेंचा १२७ जागांचा सर्व्हे पूर्ण

# आमचीही १९९ जागांवर तयारी, विरोधी उमेदवार देऊ–ओबीसी नेते प्रकाश शेंडगे



**मुंबई (वृत्तसंस्था)–राज्य सरकारने आरक्षण दिले नाही तर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील विधानसभा निवडणूक लढवण्याच्या तयारीत आहेत. त्यासाठी त्यांनी १२७ जागांवर पहिला सर्व्हे देखील केल्याचा दावा केला. स्वत:चा पक्ष काढायचा की अपक्ष लढायचे याची रणनीती ठरवू असेही त्यांनी सांगितले. जरांगे यांच्या निवडणुकीत उतरण्याच्या इशाऱ्याला आता ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी देखील आव्हान दिले आहे. ते जर निवडणुकीत उतरत असतील तर आम्ही देखील त्यांच्या उमेदवारांच्या विरोधात उमेदवार उभे करू, आमची देखील १९९ मतदारसंघात तयारी पूर्ण झालेली आहे, असा सूचक इशारा त्यांनी दिला. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत मराठा विरुद्ध ओबीसी अशी थेट लढत होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.**

मनोज जरांगे म्हणाले, सरकारला मी वेळ दिलेला नाही, सरकारने वेळ घेतला आहे. मी अगोदर देखील सांगितले होती की, आम्ही तयारी करतोय. माझा आणि माझ्या समाजाचा दोघांचाही राजकारणात येण्याचा कोणताही उद्देश नाही.पण सरकारच आम्हाला राजकारणात ढकलत आहे. आम्ही पहिल्या टप्प्यात २४ मतदारसंघाची चाचपणी केली आहे. आम्ही शोध घेत आहोत. आम्ही शांत का बसावे ?कोणत्याही समाजावर अन्याय झाला नाही पाहिजे. इतर समाजांनी देखील आमच्यासोबत आले पाहिजे, यासाठी चाचपणी करत आहोत. जर वेळ आली तर मराठा, मुस्लिम आणि दलित, लिंगायत यांची मोट बांधून निवडणूक लढवणार आहोत, असेही जरांगे यांनी सांगितले. जरांगे म्हणाले की, १२७ मतदारसंघात पहिला सर्व्हे केला आहे. इतर मतदारसंघात आणखी दुसरा सर्व्हे केला जाणार आहे. मी स्वतः निवडणूक लढवणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी देखील मनोज जरांगे यांच्या भूमिकेवर प्रत्युत्तर दिले. शेंडगे म्हणाले की, विधानसभा कोणी लढवावी कोणी नाही हा ज्याला त्याला संविधानाने दिलेला अधिकार आहे. यामध्ये आम्ही काही बोलू शकत नाही. मराठा समाजाला सरकारने टिकणारे १० टक्के आरक्षण दिले आहे. त्या आरक्षणाची अंमलबजावणी केली असून सरकारने ते आरक्षण घेण्यास मराठा समाजाने देखील सुरुवात केली आहे.शेंडगे म्हणाले की, जरांगे जर उमेदवार उभे करणार असतील तर ओबीसी उमेदवारही उभा राहतील, आमचं बहुमत आहे. ६० टक्के जाती या ओबीसी आहेत. दलित आणि मुस्लिमांना सोबत घेतलं तर आम्ही ८० टक्के जातो. आमचेही १९९ मतदारसंघात सर्व्हे पूर्ण झाले असून आम्हीही तशीच भूमिका घेऊ शकतो.ओबीसीमधील ज्या काही ३७५ जाती आहेत, त्या अत्यंत मागासलेल्या आहेत. ते आरक्षण जरांगे यांना काढून घ्यायचं आहे. मराठा समाजाला आम्ही आमचा मोठा भाऊ मानतो. पण गरीब समाजातील आरक्षण काढून घेतलं तर हा समाज गप्प कसा बसेल?, मुळात मराठा समाजावर गरीबी कोणी आणली आहे. त्यांच्याकडेच सर्व सत्ता, बँका आहेत. आरक्षण हा विषय गरिबी हटवण्याचा कार्यक्रमच नाही. तो सामाजिक आहे, असेही प्रकाश शेंडगे म्हणाले.



## थोडक्यात

### ही निवडणूक साधी सोपी नव्हती

**मुंबई**–ही निवडणूक साधी सोपी नव्हती, यापूर्वी मी निवडणुकीला जास्त येत नव्हतो. एक–दोनवेळा मी यायचो आणि निवडणूक तुमच्या हाती देऊन मी महाराष्ट्रभर फिरायचो. मात्र, यंदाच्या निवडणुकीत अधिक लक्ष द्यावं लागलं. पण, येथील लोकं माझ्या पाठिशी आहेत, याची मला खात्री होती, असे म्हणत येथील शालेय शिक्षणपासूनची सुरुवातही पवारांनी सांगितली. शरद पवार त्यांच्या जन्मगाव काटेवाडीतील लोकांशी संवाद साधत होते. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर देखील निशाणा साधला.कन्हेरीत नारळ फोडल्यावर यश मिळते हा आमचा सगळ्यांचा अनुभव आहे, देशात कुठंही गेलो तरी लोकं विचारायचे बारामतीत काय होईल?. माझं मन मला सांगायचं की बारामतीकर माझी साथ सोडणार नाहीत ते खरं झालं. जिथं लोकं सांगत होते मतं पडणार नाहीत, त्या बुथवर चांगली मते पडली. मोदी इथे आले आणि एकच विषय होता शरद पवार. देशाचा पंतप्रधान माझं नाव घेतो काय साधी सुधी गोष्ट आहे का? काटेवाडीकरांचा चमत्कार त्यांना कळालं, असे म्हणत शरद पवारांनी मोदींवर हल्लाबोल केला. तसेच, मोदींनी टीका केली की मतं आपल्याकडे येतात. मोदींनी अजून इथं याव, असेही पवार यांनी म्हटलं.

### ज्यांनी मतदान केले नाही त्यांना मोफत धान्य देऊ नका

**मुंबई**–नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला म्हणावे तशा जागा निवडून आल्या नाही. परंतु मोदी सरकार पुन्हा तिसऱ्यांदा स्थापन झाले. परंतु, देशभरात यंदांच्या निवडणुकीत मतदानाचा टक्का घसरलेला पाहायला मिळाला आहे. अनेक राज्यांमध्ये विशेषत: महाराष्ट्रात महायुतीला चांगलाच फटका बसला.उत्तरप्रदेशमध्ये देखील भाजपच्या लोकसभेच्या जागा घटल्या. एकंदरीत देशभरातील ही स्थिती. व मतदानाची कमी झालेल्या टक्केवारी यावरून मुंबईतील भाजप नेत्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना थेट पत्र लिहून दु:ख व्यक्त केले व एक अजब मागणी केली.तुम्ही गेल्या दहा वर्षांपासून राबवत असलेल्या मोफत धान्य योजना बंद करावी, अशी थेट मागणीच त्यांनी केली. तसेच ही योजना थेट बंद न करता ज्यांनी मतदान केले, त्यांनाच मोफत धान्य दिले जावे, अशी मागणी देखील त्यांनी केली.

## ’ग्रामीण कृषी कार्यानुभव’ करिता प्रथमच शेगांव(खुर्द) या गावाची निवड

**शेगाव (खुर्द) । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची व आधुनिक शेती पद्धतीची माहिती मिळावी व त्यातून त्यांच्या आर्थिक उत्पादनात वाढ होऊन शेतकरी समृद्ध व्हावा याकरिता नवनविन आधुनिक प्रयोगात्मक माहिती देण्यासाठी महारोगी सेवा समिती व्दारा संचालित डॉ पंजाबराव कृषी विद्यापीठ अकोलाशी संलग्नित ’आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाच्या ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांचे आगमण झाले.




यावेळी गावचे सरपंच मोहित महेंद्र लभाने, ग्रामसेवक शिरपुरकर, ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी तसेच गावातील प्रतिष्ठीत नागरिक यांनी कृषीदुतांचे स्वागत केले.कृषी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. एस पोतदार, कार्यक्रम प्रभारी डॉ. आर व्ही महाजन, कार्यक्रम समन्वयक, डॉ. आर तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली चतुर्थ वर्षातील विद्यार्थी संपूर्ण सत्रातील विविध प्रकारच्या आधुनिक तंत्रज्ञानाची व आधुनिक शेती पद्धतीची माहिती सामायिक करतील आणि त्याच बरोबर शेतकऱ्यांकडून त्यांचे अनुभव प्राप्त करतील. शेतकऱ्यांना मार्गदर्शनासाठी आयोजित या कार्यक्रमामध्ये शेगांव(खुर्द) येथे आगमन झालेल्या कृषीदुतां मध्ये रोहित गलांडे, कुणाल कोहळे, संभव बैद, प्रज्वल चटकी, प्रेम बासेवार, सागर जरे व हर्षल खाटिक यांचा समावेश असून प्रथम च गावात कृषीदुतांचे आगमन झालेले आहे.

## २१ जून रोजी विद्यापीठाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जगभरात दरवर्षी २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. योगाच्या प्राचीन पद्धती आणि मानवजातीच्या कल्याणासाठी योगाचे जागतिक महत्त्व आहे. त्याअनुषंगाने, २१ जून रोजी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे सकाळी ७ ते ८ या वेळेत योग दिनाचा मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमास विद्यापीठातील सर्व अधिकारी- कर्मचारी, विद्यार्थी- विद्यार्थीनींनी सहभागी व्हावे, असे गोंडवाना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अनिल हिरेखन यांनी कळविले आहे.



## वारंवार खंडीत होणारा विद्युत पुरवठा नियमित सुरू ठेवण्यासाठी तात्काळ उपाययोजना करा!

### विधानसभा निवडणुक प्रमुख देवराव भोंगळे यांचे अधीक्षक अभियंत्यांना निवेदन!

**राजुरा । प्रतिनिधी**

विज वितरणामध्ये आशिया खंडात दुसऱ्या क्रमांकावर येणाऱ्या चंद्रपुर जिल्ह्यातून महाराष्ट्रासह इतर राज्यातही विज पुरवठा केला जातो; परंतू राजुरा विधानसभा क्षेत्रातील राजुरा, कोरपना, गोंडपिपरी व जिवती तालुक्यात वारंवार विनाकारण विज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये विज वितरण विभागाच्या कार्यप्रणालीबाबत प्रचंड नाराजी पसरली आहे. त्यामुळे खंडीत होणारा विद्युत पुरवठा नियमित सुरू ठेवण्यासाठी महावितरणने तात्काळ उपाययोजना करावी, अशी मागणी भाजपाचे राजुरा विधानसभा निवडणुक प्रमुख देवराव भोंगळे यांनी आज (१९ जून) महावितरणच्या अधिक्षक अभियंता श्रीमती चिवंडे यांना भेटून दिलेल्या निवेदनातून केली आहे.



त्यांनी महावितरणच्या चंद्रपुर येथील कार्यालयात जाऊन शिष्टमंडळासह हे निवेदन दिले. यावेळी त्यांच्यासमवेत गडचांदूरचे शहराध्यक्ष सतीश उपलेंचवार, नगरसेवक अरविंद डोहे व अशोक झाडे उपस्थित होते.

सद्यस्थितीत पाऊस नियमित नसल्याने वातावरणात प्रचंड उकाडा जाणवत आहे, अशात विज पुरवठा नियमित असण्याची नितांत आवश्यकता आहे. गर्मीमुळे लहान बालके, वयोवृद्ध नागरीक विजेच्या सारख्या लपंडावाने हैराण झाले आहेत. पाऊस किंवा वादळसदृश परिस्थिती नसतांनाही या भागात नेहमीच विनाकारण विज पुरवठा खंडित केला जातो, असे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे या गंभीर समस्येची तात्काळ दखल घेऊन महावितरणने योग्य उपाययोजना कराव्यात, यासोबतच राजुरा शहरात तर विजेच्या लपंडावाची मोठी समस्या आहे. वारंवार खंडीत होणाऱ्या विद्युत पुरवठ्याने नागरीकांमध्ये मोठा क्षोभ निर्माण झाला आहे. त्यामुळे त्याकडेही विशेष लक्ष घालून योग्य उपाययोजना करण्यासंदर्भात याठिकाणी चर्चा करण्यात आली.

अन्यथा लोकभावना लक्षात घेऊन आपल्या विभागाविरूद्ध मोठे जनआंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही विधानसभा निवडणूक प्रमुख देवराव भोंगळे यांनी यावेळी महावितरणला दिला.

## खासदार धानोरकरांच्या भावाची दादागिरी !

# कर्नाटका एम्टा कंपनीच्या अधिकाऱ्यांना शिविगाळ ,कार्यकर्त्यांकडून मारहाण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

काँग्रेस च्या नवनिर्वाचित खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या समक्ष त्यांचा भाऊ प्रवीण काकडे आणि कार्यकर्त्यांनी कर्नाटक एम्टा कोळसा खाणीच्या अधिकाऱ्यांना शिवीगाळ करून मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार गुरूवार, १९ जून रोजी भद्रावती येथील बरांज येथे घडला.पोलिसांसमोर अधिकाऱ्यांना शिवीगाळ करण्यात करण्यात आली. त्यात खासदाराचे भाऊच आघाडीवर होते. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी होत आहे.

खासदाराच्या भावाने हा पराक्रम केल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधान आले आहे. तर या घटनेचा व्हिडिओ आता समाज माध्यमातून समोर आल्याने खासदार धानोरकर यांच्या प्रतिमेला चांगलाच धक्का पोहोचला. जिल्ह्यातील भद्रावती तालुक्यात कर्नाटक एम्टा कोळसा खाण आहे. ही खाण कर्नाटक सरकारची आहे. या खाणीतील कोळसा वाहतुकीमुळे पिकांना मोठा फटका बसू लागला आहे.






सोबतच प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न आहेत. या प्रश्नांना घेवून खा. धानोरकर व्यवस्थापनासोबत चर्चा करण्यासाठी गुरूवारी खाण परिसरात गेल्या होत्या. त्यांच्यासोबत भाऊ प्रवीण काकडे आणि असंख्य कार्यकर्ते व प्रकल्पग्रस्त देखील होते. अधिकाऱ्यांशी चर्चा सुरू असतानाच खा. धानोरकर यांच्याऐवजी त्यांचा भाऊ प्रवीण काकडे हा स्वतः लोकप्रतिनिधी असल्याच्या अविर्भावात अधिकाऱ्याला विचारपूस करीत होता. विशेष म्हणजे, अधिकाऱ्यांशी चर्चा करता–करता प्रवीण काकडे यांनी शिवीगाळ केली आणि त्याचवेळी नीलेश भालेराव यांनी त्या अधिकाऱ्याच्या कानशिलात थापड लगावली. यानंतर एकच गोंधळ उडाला.अधिकाऱ्यांना सर्वांनी शिवीगाळ करणे सुरू केले. यावेळी उपस्थित पोलिसांनी परिस्थिती आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. त्याला फार यश आले नाही. यावेळी एकच गोंधळ उडाल्याने व संतप्त जमाव अधिकाऱ्यांना मारहाण करतो की काय, अशी स्थिती निर्माण झाल्याने पोलिसांच्या मदतीने अधिकाऱ्यांना कसेबसे बाहेर काढण्यात आले.अधिकाऱ्यांशी चर्चा करण्याची, मागण्या ठेवण्याची एक पद्धत असते, शिष्टाचार असतो, पण यावेळी तो पाळण्यात आला नाही. खुद्द खासदारांच्या सख्ख्या भावानेच शिवीगाळ करायला सुरुवात केल्याने निकाल लागताच मुजोरी आल्याची चर्चा या परिसरात रंगू लागली आहे. दरम्यान अशा घटनांमुळे कोळसा खाणीचे अधिकारी तथा कर्मचारी या भागात काम करायला तयार नाहीत. लोकप्रतिनिधींच्या नातेवाईकांची अशा प्रकारची दादागिरी व मुजोरी सुरू असल्याने या भागात काम करणारे अधिकारी त्रासले आहेत.

# संस्कृती व बहुसांस्कृतिकीकरणात विविधता!

**जागतिक रिफ्यूजी डे– शरणार्थी दिन दरवर्षी २० जून रोजी जगभरात साजरा केला जातो. निर्वासितांना आदर देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. जगभरात असे कितीतरी लोक आहेत, ज्यांना घराबाहेर जाण्यास भाग पाडले गेले. अशा निर्वासितांचा सन्मान करण्यासाठी संयुक्त राष्ट्र हा दिवस साजरा करते. याबद्दल महत्वपूर्ण संकलित माहीती श्रीकृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींनी सदर लेखात प्रस्तुत केली आहे... संपादक.**

अभयारण्य शोधण्याच्या आणि चांगले जीवन जगण्याच्या आशेने आपल्या देशातून संघर्ष आणि छळातून पळून गेलेल्या निर्वासितांची ताकद ओळखणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. जागतिक निर्वासित दिन त्यांच्या दुरवस्थेसाठी समजून घेण्याची संकल्पना तयार करतो, जे त्यांच्या भविष्याच्या पुनर्बांधणीमध्ये लवचिकता आणि धैर्य दर्शवते. निर्वासितांच्या समुदायातील समृद्ध विविधता अनुभवण्याची, समजून घेण्याची आणि साजरी करण्याची प्रत्येकासाठी संधी म्हणून हा दिवस पाहिला जातो . थिएटर, नृत्य, चित्रपट आणि संगीत यासारख्या कार्यक्रमांचा उद्देश निर्वासित समुदाय संस्था, स्वयंसेवी आणि वैधानिक संस्था, स्थानिक परिषद आणि शाळांना या कारणाचा सन्मान करण्यासाठी आठवड्यात कार्यक्रम आयोजित करण्याची परवानगी देणे आहे. सन १९५१ अनुसार शरणार्थी कन्व्हेन्शन शरणार्थीला एक व्यक्ती म्हणून मान्यता देते जी त्यांच्या वंश, धर्म, सामाजिक गटाच्या सहभागामुळे किंवा भिन्न राजकीय मतांमुळे प्रभावित होण्याच्या भीतीमुळे त्यांच्या मूळ देशात परत येऊ शकत नाही.

निर्वासित जगामध्ये एक भूमिका बजावतात, कारण जेव्हा ते त्यांच्या यजमान देशामध्ये कायदेशीर रोजगाराच्या संधींमध्ये प्रवेश करण्याच्या मनःस्थितीत असतात तेव्हा ते त्यांच्या ज्ञानाचा उपयोग देशाच्या श्रम बाजारातील अंतर भरून काढण्यात मदत करण्यास सक्षम असतात. समाजातील या समावेशामुळे संस्कृती आणि बहुसांस्कृतिकीकरणात अधिक वैविध्य निर्माण होते, जे समाजाला एकमेकांकडून शिकण्याची संधी देते. बहुसंख्य निर्वासित अशा पार्श्वभूमीतून आलेले आहेत, जिथे त्यांना औपचारिकपणे नोकरी दिली गेली आहे आणि ते त्यांच्या नवीन देशाला देशाच्या सुरक्षेसाठी तसेच त्यांच्या कमाईमध्ये योगदान देण्यासाठी मदत करू शकतात. एखाद्या देशात निर्वासित



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

असल्यामुळे, यजमानांना सरकारद्वारे पुरविल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या आरोग्य सेवांमध्ये प्रवेश यासारख्या सेवांच्या किमतीत वाढ करण्याची तयारी करणे देखील आवश्यक आहे. ते वेगवेगळ्या आंतरसांस्कृतिक देवाणघेवाणीमध्ये मध्यस्थ म्हणून काम करून समाजात योगदान देण्याची क्षमता निर्माण करण्यास सक्षम आहेत, याचा अर्थ असा आहे की देश समुदायामध्ये अधिक प्रभावी सामाजिक–सांस्कृतिक विविधता अनुभवण्यास सक्षम असेल.

सब है भूमी गोपाल की ही आपली भारतीय धारणा. पण, सगळी भूमी ईश्वराची असली तरी माणसाने ही भूमी वाटून घेतली आहे. तिथे आपापले साम्राज्य वसवले आहे. २० जून हा आंतरराष्ट्रीय शरणार्थी दिवस साजरा होतो. या दिनानिमित्त जग, जगातील देश आणि जगभरातील माणसे याबाबतची संकल्पना समजून घ्यायला हवी. खरे म्हणजे शरणार्थी हा शब्द तसा काटेरीच वाटतो. एखाद्या माणसाला हक्काचे घर नसणे एकवेळ समजू शकतो. पण, हक्काचा देश नसणे किंवा देश असला तरी त्या देशातून त्याला अत्यंत दु:खदपणे नाईलाजाने विस्थापित व्हावे लागेल, तर त्या व्यक्तीचे दु:ख, प्रश्न गंभीरच असतात. शरणार्थी म्हणून तो ज्या देशामध्ये जाईल, तेथील संस्कृती, तेथील भौगोलिक, सामाजिक वातावरण आणि स्थानिकांशी जुळवून घेणे त्याला क्रमप्राप्तच असते, मात्र ते फार अवघड आहे. त्यामुळेच की काय जागतिक स्तरावर शरणार्थी दिन पाळला जातो. हेतू हाच की, यानिमित्ताने जगभरातल्या शरणार्थींच्या प्रश्नांना वाचा फोडता येईल. शरणार्थींच्या हक्कांबाबत जागृती करता येईल. दुसर्या महायुद्धाचे गंभीर परिणाम युरोपीय राष्ट्रांवर झाले. भय, भूक, जीवाच्या आकांताने लोक जगण्यासाठी दुसर्या शहरात नव्हे, दुसर्या राज्यात नव्हे, तर दुसर्या देशात पळून गेले. पण, जगण्यासाठी ते ज्या दुसर्या देशात गेले, तिथे त्यांचे स्वागत केले गेले असेल का? उत्तर स्पष्ट आहे. या शरणार्थींना त्या त्या देशातील स्थानिकांनी जगण्यासाठी अर्टी–शर्ती समोर ठेवल्या असतीलच. जग नुकतेच युद्धाच्या खाईतून बाहेर येऊ पाहत होते. दु:ख, नैराश्य त्यातच या शरणार्थींचा प्रश्न. त्यांना निर्वासितही म्हणू शकतो. त्यामुळे १९५१ साली युरोपीय देशांनी मानवतेच्या दृष्टिकोनातून या शरणार्थींना जगण्याच्या संधी मिळाव्यात, यासाठी मसुदा तयार केला. त्यामध्ये त्यांनी असे ठरवले की, येणार्या शरणार्थींना देशात राहू द्यायचे. त्यांना मानवतेच्या दृष्टिकोनातून सर्व मूलभूत हक्क आणि अधिकार द्यायचे. त्यानंतर जगाने पाहिले की, युरोपीय देशांमध्ये या ना त्या कारणाने विस्थापित झालेले लोक युरोपमध्ये गेले. पण, एक वेळ अशी आली की, निर्वासितांच्या लोंढ्यांमुळे देशातील मूळ नागरिकांनाच मूलभूत हक्कांपासून वंचित व्हायची वेळ आली.

झालं काय? तर, शरणार्थींमुळे लोकसंख्या वाढली. मात्र, देशातील साधनसामग्री त्या तुलनेत त्या दराने वाढली नाही. युरोपातील बहुतेक देश या निर्वासितांच्या विरोधात गेले. त्यांनर २००१ साली आफ्रिका खंडातील देशांमधील यादवी युद्धे, अंतर्गत संघर्ष यामुळे तिथे मोठ्या संख्येत नरसंहार होऊ लागला. लोक विस्थापित होऊ लागले. या मुद्यावर संयुक्त राष्ट्र महासभेने २० जून २००१ला पहिल्यांदा आंतरराष्ट्रीय शरणार्थी दिवस संकल्पना राबवली. जवळ जवळ १५१ देशांनी शरणार्थींना शरण देण्याच्या मुद्याला समर्थन केले. त्यामुळे आपण पाहतो की, युरोप खंडाशी संलग्न असलेल्या मुस्लीम देशातील नागरिक मोठ्या संख्येन युरोपमध्ये शरणार्थी म्हणून जातात. जागतिक करारानुसार युरोपीय देश आपल्याला शरण देतीलच, त्याशिवाय आपल्याला सगळे सनदशीर हक्कही देतील, हे या मुस्लीम देशातील नागरिकांना माहिती आहे. मात्र यामुळे युरोपीय खंडातील बहुतेक राष्ट्रे दुहीच्या उंबरठ्यावर आलेली आहेत. आशिया खंडातही रोहिंग्या मुस्लिमांमुळे शरणार्थी संकल्पनेवर प्रश्नचिन्ह उभा राहिला आहे. असो, शरणार्थींच्या मदतीसाठीच्या करारावर भारताने सही केलेली नाही. त्यामुळे भारतात शरणार्थी म्हणून कुणीही कसेही येऊ शकत नाही.

युएनएचसीआरने सप्टेंबर २०१४ साली अंदाज वर्तवला होता की भारतामध्ये १ लाख ९ हजार तिबेटी निर्वासित, ६५,७०० श्रीलंकन, १४,३०० रोहिंग्या, १०,४०० अफगाणी, ७४६ सोमाली आणि ९१८ अन्य निर्वासित आहेत. सन २०१७ सालच्या अहवालानुसार जगभरात ६८.५ दशलक्ष लोक आपल्याच देशात विस्थापित आहेत. अशा शरणार्थींसोबत काम करणारी युएनशी संबंधित संस्थेच्या हाय–कमिशनर फिलीफो ग्रांडी म्हणतात, युद्धजन्य परिस्थितीने जगभरात निर्वासितांच्या संख्येत वाढ होत आहे. ही गोष्ट जगासाठी दु:खदायक आहे. हे असे निर्वासित जगणे युद्धाचे प्रतीक आहे. आंतरराष्ट्रीय शरणार्थी दिनानिमित्त इतकेच वाटते की, नाईलाजास्तव प्रचंड तणावाने आणि दु:खाने आपली मातृभूमी सोडून दुसर्या देशात शरण मागण्याची वेळ कुणावरही यायला नको.

शरणार्थी अशी व्यक्ती आहे जी युद्ध, संघर्ष छळ आणि हिंसेच्या परिणामांमुळे आपला देश सोडते ज्याचा त्यांनी त्यांच्या देशात सामना केला आहे. आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडण्याच्या प्रक्रियेतून, काही निर्वासितांना बहुतेक वेळा कमीत कमी कपडे आणि संपत्ती सोबत ठेवावी लागते; वेगळ्या देशात सुरक्षितता आणि आश्रयस्थान शोधण्याच्या योजनेसह त्यास भाग पडते. जागतिक निर्वासित दिन हा जागतिक निर्वासित सप्ताहाद्वारे देखील साजरा केला जातो आणि आश्रय शोधणाऱ्यांना आणि निर्वासितांना ते राहत असलेल्या समुदायाद्वारे पाहण्याची, ऐकण्याची आणि त्यांची कदर करण्याची एक महत्त्वाची संधी प्रदान करण्यासाठी डिझाइन केलेले आहे.

!! आंतरराष्ट्रीय शरणार्थी दिनाच्या सर्व शरणार्थींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

## महाडीबीटी पोर्टलवर शेतकऱ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजना अंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर राबविण्यात येणा–या बाबीकरीता शेतक–यांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजना व इतर तेलबिया पिकातील मूल्यसाखळीस चालना देणे या उद्देशाने राज्य पुरस्कृत विशेष कृती योजना सन २०२२–२३ ते २०२४–२५ या तीन वर्षात राबविण्यात येत आहे. सन २०२४–२५ मध्ये योजनेंअंतर्गत चालू खरीप हंगाम मध्ये खालील निविष्ठा पुरविण्यात येणार आहेत. नॅनो युरिया सोयाबीन, नॅनो डीएपी सोयाबीन, नॅनो युरिया कापूस, नॅनो डीएपी कापूस करीता अर्ज करण्याचा कालावधी ३० जून २०२४ पर्यंत आहे. तर मेटाल्डीहाईड सोयाबीन करीता २३ जून २०२४ पर्यंत अर्ज सादर करावयाचा आहे.वरील निविष्ठांचा पुरवठा करण्याकरीता लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या ऑनलाईन अर्जातून ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहे. त्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर दिनांक १२ जून २०२४ पासुन सदर बाबींच्या टाईल्स उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. बियाणे, औषधे व खाते या टाईल अंतर्गत शेतक–यांना अर्ज करता येतील. तरी जास्तीत जास्त शेतकरी बांधवानी ारहरवलीं.ारहरीरीहींर.सीं.ळप षरीाशी श्रेसळप या वेबसाईड वर जाऊन ऑनलाईन अर्ज करावेत व योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.

## २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

संयुक्त राष्ट्र संघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योगदिन म्हणून घोषित केला आहे. त्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून मुख्य शासकीय योग दिनाचा कार्यक्रम दि. २१ जून २०२४ रोजी सकाळी ७ वाजता तालुका क्रीडा संकुल, बल्लारपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. व्यक्तीच्या शारीरिक आणि आध्यात्मिक विकासासाठी योग विद्या सहाय्यभुत आहे. या कार्यक्रमामध्ये शाळा, महाविद्यालय मधील विद्यार्थ्यांकडून तसेच जिल्हास्तर विविध योग समिती, एन. एस. एस., नेहरु युवा केंद्र इ. युवा संघटनामार्फत योगा संबंधी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. सदर योग दिन कार्यक्रमाकरिता पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी व विविध कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी, तसेच पतंजली योग समिती, पतंजली योगपीठ संस्था, जिल्हा योग संघटनेचे पदाधिकारी आणि शहरातील नागरीक व खेळाडू उपस्थित राहणार आहे.तरी सर्व नागरीक, योगसाधक, जेष्ठ नागरीक यांनी दि. २१ जून २०२४ रोजी सकाळी ६.३० वा. तालुका क्रीडा संकुल, बल्लारपूर येथे उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पूंड यांनी केले आहे.

## १ ली ते ८ वी तील विद्यार्थ्यांना मिळणार एक जोडी बुट व पायमोजे

### १ लाखाच्या वर विद्यार्थ्यांसाठी पाऊणे दोन कोटी रुपये वर्ग

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

मोफत गणवेश योजनेप्रमाणेच शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता १ ली ८ वी मधील सर्व विद्यार्थ्यांना सन २०२३–२४ पासून दरवर्षी एक जोडी बुट व दोन जोडी पायमोजे चा लाभ शाळा व्यवस्थापन समितीकडून देण्यात येत आहे. याकरीता प्रति विद्यार्थी १७० रुपये इतकी रक्कम निश्चित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने चंद्रपूर जिल्ह्यातील १६१० शाळांमधील १ लक्ष २ हजार ४२५ विद्यार्थ्यांकरीता प्रति विद्यार्थी १७० रुपये याप्रमाणे एकूण १ कोटी ७४ लक्ष १२ हजार २५० रुपयांचा निधी वर्ग करण्यात आला आहे. शाळा व्यवस्थापन समिती स्तरावरून सर्व विद्यार्थ्यांना एक जोडी बुट व दोन जोडी पायमोजेचा लाभ देण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी कळविले आहे.केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ८ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या सर्व मुली, अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील मुले तसेच दारिद्र्य रेषेखालील पालकांच्या मुलांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो. तसेच सन २०२३–२४ या शैक्षणिक वर्षापासून प्रस्तुत योजनेचा लाभ दारिद्र्य रेषेवरील पालकांच्या मुलांनासुद्धा देण्याबाबतचा निर्णय ६ जुलै २०२३ च्या शासन निर्णयाद्वारे घेण्यात आला. केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत मोफत गणवेश योजनेकरीता निर्धारीत केलेल्या प्रती गणवेश ३०० रुपये याप्रमाणे राज्य शासनानेसुध्दा दोन गणवेशाकरीता प्रति विद्यार्थी ६०० रुपये रक्कम निश्चित केली आहे.

## आमदार शहाजीबापूंच्या संपर्क कार्यालयात शिवसेनेचा ५८ वा वर्धापनदिन साजरा

**सांगोला । प्रतिनिधी**

मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी स्थापन झालेली संघटना म्हणजे शिवसेना. १९ जून १९६६ रोजी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना केली होती. सांगोला येथे आमदार शहाजीबापू पाटील यांच्या संपर्क कार्यालयात शिवसेनेचा ५८ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी लावलेल्या शिवसेना छोट्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे. बुधवार १९ जून रोजी ५८ व्या वर्धापनदिनी सांगोल्यात आमदार शहाजीबापू पाटील यांच्या संपर्क कार्यालयात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिवसेनेच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. आज वर्धापनदिन साजरा होत असतानाच राज्यात शिवसेनेचे लोकप्रिय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कुशल नेतृत्वाखाली अतिशय चांगल्या प्रकारे कारभार सुरू आहे. त्यामुळे वेगळाच आनंद व्यक्त होत आहे. सोशल मिडियावर देखील शिवसेनेच्या स्थापनेपासूनच्या आजवरच्या आठवणींना शिवसैनिकांनी उजाळा दिला. तसेच कार्यकर्त्यांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या.यावेळी युवासेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख सागर पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, उद्योजक बाळासाहेब आसबे, विद्यार्थी संघटनेचे तालुकाप्रमुख अजिंक्य शिंदे, प्रितिश दिघे यांच्यासह शिवसेना, युवासेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# हंसराज अहीर यांच्या प्रयत्नांना भरीव यश वेकोलि प्रकल्पग्रस्तांना शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरीचे नियुक्तीपत्र

### सास्ती विस्तारीकरण प्रकल्पातील नोकरी प्रस्ताव महिनाभरात स्वीकारणार; गोवरी–पौनी प्रकल्पातील आर्थिक मोबदला बिलाला लवकरच अंतिम मंजुरी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

वेकोलिच्या विविध क्षेत्राशी निगडीत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे अनेक प्रलंबित प्रश्न, समस्यांच्या निवारणार्थ सुनावणी, बैठक व बृहत पत्रव्यवहार व सतत पाठपुराव्याने अखेर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या अनेक ज्वलंत प्रश्नांची सोडवणूक करण्यात राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर याना यश मिळाले असून दि. १७ जून २०२४ रोजी हंसराज अहीर यांच्या अध्यक्षतेत नागपुरातील वेकोलि विश्रामगृहात वेकोलिचे अध्यक्ष तथा प्रबंध निदेशक (सीएमडी) व अन्य वरिष्ठांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत विविध महत्वपुर्ण प्रलंबित समस्यांचे निराकरण झाल्याने प्रकल्पग्रस्तांच्या दृष्टीने ही बैठक फलदायी ठरली आहे.

सदर बैठकीस वेकोलि मुख्यमहाप्रबंधक (भूमि) व (औ.स.) मांजी आमदार सुदर्शन निमकर, विनोद शेरकी, ॲड. इंजी. प्रशांत घरोटे, धनंजय पिंपळशेंडे, मधुकर नरड, पवन एकरे, कोलगांवचे उपसरपंच पुरुषोत्तम लांडे, चुनाळाचे सरपंच बाळनाथ वडसकर, लक्ष्मण बोढे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

वेकोलि प्रबंधनाने सास्ती एक्सपॉन्शन प्रकल्पातील नोकरीचे प्रस्ताव या महिनाभरात स्वीकारण्यास अनुमती दिली. गोवरी पोवनी प्रकल्पातील आर्थिक मोबदला देयकास अंतिम मंजूरीही जून महिन्यातच देण्याचे मुख्यालयाने मान्य केले. गोवरी सेंट्रल प्रकल्प सेक्शन ४ करीता लवकरच प्रस्तावित करण्याचे तसेच भूमि अधिग्रहण प्रकल्पातील ग्रैंड डॉटर (नात) मुलीचा मुलगा/मुलगी व सुनेच्या नोकरीविषयी लवकरच निर्णय होवून अनुकंपा नोकरीत विवाहीत मुलीच्या तसेच मृतक नामनिर्देशीताचा भाऊ, बहीण यांना नोकरी देण्याविषयी



मुख्यालयीन स्तरावर लवकरच सकारात्मक निर्णय होणार असल्याची माहिती सीएमडी यांनी हंसराज अहीर यांना या बैठकीत दिली.

न्यायालयीन प्रकरणातील प्रलंबित नोकऱ्या मार्गी लावण्यास गुणवत्ता प्राधान्य प्रकरणामध्ये निर्णय घेण्याबाबत ठोस धोरण स्वीकारले जाईल, भूमिगत खाणीतून सुरक्षा प्रहरीकरीता आवेदन केलेल्या कामगारांची कॅडर बदल विषयक सुची प्रकीयाधीन असून ती लवकरच जाहीर करण्यात येईल असेही बैठकीत आश्वस्त करण्यात आले. या व्यतिरिक्त पोवनी, सास्ती, सोनुर्ली गावातील उर्वरीत जमिनीचे अधिग्रहण, सीएमपीडीआयएल द्वारा सर्व्हेक्षण करुन तातडीने अंमल करण्याच्या सुचना एनसीबीसी अध्यक्षांनी केल्या. यावेळी भटाळी, पाटाळा व अन्य प्रकल्पातील एक सातबारा व २ एकर पेक्षा अधिक तसेच दोन आराजी असल्यास फेरफार प्रक्रियेनंतर २ नोकऱ्या देण्यास अडचण नसल्याचे ही प्रबंधनाने या बैठकीत स्पष्ट केले. तुकडेबंदी अवहेलना प्रकरणात प्रलंबित नोकरी प्रस्तावाबाबत जिल्हाधिकारी स्तरावर सकारात्मक निर्णय घेण्यात यावा अशा सुचना देण्यात आल्या. सदर बैठकीत या व्यतिरिक्त अनेक महत्वपुर्ण विषयांवर शिक्कामोर्तब झाल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये संतोष व्यक्त होत आहे.

# प्रकरणे निकाली काढा अन्यथा चौकशी लावू-आमदार सुधाकर अडबाले;नागपूर विभागाची समस्या निवारण सभा







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यात शिक्षकांच्या अनेक समस्या प्रलंबित असल्याने शिक्षकांनी समस्या निवारण सभेत तीव्र रोष व्यक्त केला. शिक्षकांची समस्या सोडविण्यास हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर संताप व्यक्त करीत नागपूर विभागातील सर्व शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य.) यांनी प्रलंबित असलेल्या समस्या तात्काळ निकाली न काढल्यास सर्व शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य.) कार्यालयाची चौकशी करा, असे निर्देश नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षण उपसंचालक यांना बैठकीत दिले.'समस्या तुमच्या, पुढाकार आमचा' या वि.मा.शि. संघाच्या उपक्रमाअंतर्गत नागपूर विभागातील शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रलंबित समस्या निवारणार्थ समस्या निवारण सभा शिक्षण उपसंचालक नागपूर यांच्यासोबत धनवटे नॅशनल कॉलेजच्या सभागृहात पार पडली. या सभेस विभागातील सर्व शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य.), वेतन पथक अधिक्षक (प्राथ./माध्य.), लेखाधिकारी (शिक्षण) व शिक्षण उपसंचालक कार्यालयातील सर्व अधिकारी उपस्थित होते. विशेष म्हणजे ही समस्या निवारण सभा साडेसहा तास चालली.सभेच्या सुरुवातीलाच शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी लोकप्रतिनिधींच्या सभेला उशिरा येणाऱ्या अधिकाऱ्यांचा 'क्लास' घेतला. भंडारा येथील वेतन पथक कार्यालयातील अनियमिततेबाबत चर्चा करण्यात आली. अधीक्षक यांनी केलेल्या अनियमिततेची झालेल्या चौकशीत दोषी आढळलेल्या अधीक्षकांवर कारवाई करण्यात यावी, असे निर्देश आमदार अडबाले यांनी दिले. संचालक (प्राथ./माध्य.) पूणे यांचे १ जुलै पासून शाळा सुरु करण्याबाबतचे पत्र असताना चंद्रपूर येथील शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी २६ जूनपासून शाळा सुरू करण्याचे पत्र काढले. सदर पत्र रद्द करण्याच्या सूचना शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांना दिल्या.

नगरपरिषद शालेय कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी पावत्या मिळत नसल्याने समस्या निवारण सभेचा संदर्भ देऊन शासनास पत्र देण्यात यावे. एनपीएस व जीपीएफ खाते नसलेल्या शालेय कर्मचाऱ्यांना सहाव्या व सातव्या वेतन आयोगाचे थकीत हप्ते रोखीने देण्यात यावे, याबाबत चर्चा करण्यात आली. सदर कर्मचाऱ्यांबाबत विभागातील शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य.) यांची बैठक घेऊन खाते काढण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश शिक्षण उपसंचालक यांना आमदार अडबाले यांनी दिले.सन २०२१-२२ व २०२२-२३ च्या जीपीएफ व एनपीएस पावत्याबाबत जिल्हानिहाय आढावा घेण्यात आला. ऑनलाईन पावत्या दरमहा मिळत नसल्याने शिक्षकांत नाराजी आहे. गडचिरोली जिल्ह्यात ऑफलाईन पावत्या मिळत आहे. तेव्हा विभागातील सर्व पे-युनिट अधीक्षकांनी पुढील सहा महिन्यांत ऑफलाईन पावत्या देण्याबाबत कार्यवाही करावी, असे सूचना आमदार अडबाले यांनी दिल्या.शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या १४ जून २०२३ च्या शासन निर्णयानुसार मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांना पेंशन मिळण्याबाबत सर्व शिक्षणाधिकारी यांनी कार्यवाही करावी. अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ उन्नयन करण्याबाबत सर्व जिल्ह्याने कार्यवाही करण्याबाबत शिक्षण उपसंचालक यांनी पत्र निर्गमित करावे. श्रीमती कल्पना चव्हाण (तत्कालिन शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प. चंद्रपूर) यांच्या अनियमिततेबाबत झालेल्या चौकशीवर पुढील कार्यवाही करावी. चिमूर एज्यु. सोसा. चिमूर अंतर्गत शाळेतील मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक पदोन्नतीबाबत सेवाज्येष्ठ शिक्षकांची बैठक घेऊन तात्काळ पदोन्नती देण्यात याव्या यासह अन्य विषयांवर सविस्तर चर्चा करून समस्या निकाली काढण्याच्या सूचना आमदार अडबाले यांनी शिक्षण उपसंचालक, सर्व शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य.), वेतन पथक अधिक्षक (प्राथ./माध्य.), लेखाधिकारी (शिक्षण) यांना दिल्या. शिक्षकांच्या समस्यांवर जे अधिकारी हयगय करतील तसेच सेवा हमी कायद्याचे उल्लंघन करील असतील, त्यांच्या कार्यालयाची तात्काळ चौकशी करा, अश्या सूचनाही त्यांनी दिल्या.यानंतर नागपूर विभागाअंतर्गत कार्यरत कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या समस्यांवर बैठक पार पडली. या सभेत नागपूर विभागातील सहा जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या सामूहिक व वैयक्तिक समस्यांसह चर्चा करण्यात आली. कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या प्रलंबित समस्या तात्काळ सोडवा, असे निर्देश आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षण उपसंचालक यांना दिले.यावेळी माजी आमदार व्हि. यू. डायगव्हाणे, शिक्षण उपसंचालक उल्हास नरड, रवींद्र पाटील, श्री. बोदाडकर, शेखर पाटील, विज्युक्टा महासचिव डॉ. अशोक गव्हाणकर, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, जयप्रकाश थोटे, विभागीय कार्यवाह चंद्रशेखर रहांगडाले, कोषाध्यक्ष भूषण तल्हार, जगदीश जुनगरी, प्रा. भाऊराव गोरे, डॉ. गजानन धांडे, डॉ. अभिजित पोटके, विमाशि संघाचे नागपूर शहर अध्यक्ष विठ्ठल जुनघरे, जिल्हा अध्यक्ष (ग्रा.) अनिल गोतमारे, जिल्हा कार्यवाह संजय वारकर, वर्धा जिल्हा अध्यक्ष विष्णू इटनकर, जिल्हा कार्यवाह महेंद्र सालंकार, चंद्रपूर जिल्हा कार्यवाह श्रीहरी शेंडे, भंडारा जिल्हा अध्यक्ष सुधाकर देशमुख, जिल्हा कार्यवाह राजेश धुर्वे, गडचिरोली जिल्हा अध्यक्ष रवींद्र नैताम, जिल्हा कार्यवाह अजय लोंढे, गोंदिया जिल्हा अध्यक्ष ओमप्रकाश गुप्ता व मोठ्या संख्येने नागपूर विभागातील वि.मा.शि. संघ, विज्युक्टाचे पदाधिकारी, समस्याग्रस्त शिक्षक उपस्थित होते.

# डोंगरे यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार



**पुलगाव । प्रतिनिधी**

सिनेआर्क प्रोडक्शन आणि रुद्रांश फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२४ पुणे येथे संपन्न झाला. या कार्यक्रमात चंद्रसेन डोंगरे पुलगाव व रमाई फेम लता चंद्रसेन डोंगरे यांना महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा कार्यक्रम डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन मंगळवार पेठ पुणे येथे संपन्न झाला ,संपूर्ण महाराष्ट्रातून विविध कार्यक्षेत्रात सर्वत्र आदरास पात्र असणारे प्रेरणास्त्रोत ज्यांचा आपल्या संपूर्ण भारत देशाला अभिमान वाटावा,अशा निस्वार्थ अभुतपूर्व काम करणाऱ्या व्यक्तींना हा सन्मान देण्यात आला. हा सन्मानाचे प्रमुख अतिथी ज्ञानेश्वर मोहोळ माजी अतिरिक्त आयुक्त पुणे महानगरपालिका ,युनूस पठाण स विद्यमान उप आयुक्त पुणे महानगरपालिका तसेच एड् शैलेजा ज्ञानेश्वर मोहोळ यांच्या द्वारे हा पुरस्कार देण्यात आला. याप्रसंगी १०१ मान्यवर सत्कार मूर्तींचा महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला या कार्यक्रमाचे मुख्य संयोजक सिनेआर्क प्रोडक्शन आणि रुद्रांश फाउंडेशन मुंबई चे मॅनेजिंग डायरेक्टर व सीईओ विनोद खैरे मुंबई हे होते.

# आम आदमी पार्टी वरोरा-भद्रावती विधानसभा क्षेत्राची स्मार्ट मीटर योजने संदर्भात व निवडणूक आढावा बैठक संपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

१८ जून रोज मंगळवार ला जिल्हा उपाध्यक्ष तथा वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्राचे अध्यक्ष सुरज शहा यांच्या नेतृत्वात वरोरा - भद्रावती विधानसभा निवडणुक आढावा व स्मार्ट मीटर विरोधात मुंबई येथे आंदोलन विषयी बैठक संपन्न झाली. बैठक वरोरा येथील शासकीय विश्रामगृहात वरोरा तालुका अध्यक्ष गौरव मेले यांनी आयोजित केली व भद्रावती येथील शासकीय विश्रामगृहात भद्रावती शहर अध्यक्ष अनिल कुमार राम यांनी आयोजित केली. या बैठकीत प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे संघटन सचिव भूषण ढाकुलकर, जिल्हा अध्यक्ष मयूर राईकवार, युवा विदर्भ संघटनमंत्री प्रणित डोंगरे व जिल्हा सचिव प्रशांत सिदुरकर उपस्थित होते.



स्मार्ट मीटर विरोधात नुकताच आम आदमी पार्टी ने राज्यव्यापी आंदोलन करून स्मार्ट मीटर विषयी स्थगिती देण्यास राज्य सरकार ला भाग पाडले. परंतु स्थगिती आश्वासन तोंडी असून कुठेच लेखी स्वरूपात देण्यात आली नसून विधानसभा निवडणुकी पुरता आहे. विधानसभा निवडणूक झाल्यावर ही स्मार्ट मीटर योजना पुन्हा महाराष्ट्राच्या गोर गरीब शेतकरी वर्गावर व सामान्य परिवारावर लादण्यात येणार आहे. त्या करिता येत्या काही दिवसात आम आदमी पार्टी च्या माध्यमातून भव्य आंदोलन मुंबई मधे होणार असून तिथं संपूर्ण महाराष्ट्राची जनता एकत्रीत येऊन स्मार्ट मीटर योजने विरोधात तीव्र आंदोलन करणार आहे व या तानाशाही सरकार ला ही स्मार्ट मीटर योजना रद्द करण्यास भाग पाडणार आहे. येत्या काळात आम आदमी पार्टी कडून संपूर्ण महाराष्ट्र मध्ये विधानसभा निवडणुक स्वबळावर लढणार आहे व काही दिवसात याची जाहीर घोषणा सुद्धा करण्यात येणार आहे. अशी माहिती यावेळी महाराष्ट्राचे संघटन सचिव भूषण ढाकुलकर यांनी दिली. यावेळी भद्रावती शहराध्यक्ष अनिल कुमार राम, वरोरा तालुका अध्यक्ष गौरव मेले, युवा जिल्हा उपाध्यक्ष सुमित हस्तक, जिल्हा सहसचिव सोनाल पाटील, वरोरा तालुका उपाध्यक्ष अमोल पिंपळशेंडे, वरोरा शहर अध्यक्ष बंटी खडके, विनीत निमसरकर, सचिन पाटील, प्रफुल शेलार, रितेश नगराळे, प्रेम दुधलकर,दिलीप कापकर(चांडणखेडा), राजकुमार चट्टे, बाळूभाऊ बांदुरकर, राहुल सोनटक्के (संस्थापक झोपडपट्टी विकास संघटना म.राज्य), संदीप भाऊ चटपकर सामाजिक कार्यकर्ते तसेच इतर पदाधिकारी, कार्यकर्ते व सामजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे कानमंत्र देण्यासाठी कृषीकन्यांचे जामगांव (बु.) येथे आगमन

**वरोरा । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना विविध प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानाची व आधुनिक शेती पद्धतीची माहिती मिळावी तसेच जास्तीच जास्त आर्थिक उत्पन्न व्हावे आणि शेतकरी सधन व्हावा याकरिता माहिती देण्यासाठी महारोगी सेवा समिती व्दारा संचालित डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला शी संलग्नित आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाच्या ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्ग्रमाअंतर्गत जामगांव (बू.) येथे कृषी कन्यांचे आगमन झाले

यावेळी गावातील माजी सरपंचलक्ष्मण ठेंगणे,तसेच इतर रहिवासी अक्षय ताजने,विजय तुराणकर,अविनाश तूराणकर, प्रशांत ताजने,निलेश ठेंगणे,ईश्वर आसुटकर तसेच ग्रामपंचायत सदस्य व रहिवासी यांनी या कृषी कन्यांचे स्वागत केले.

शेतकऱ्यांना चारा प्रक्रिया,माती परीक्षण, जनावरांसाठी लसीकरण,मोबाईल प चा वापर कसा करावा,तन नियंत्रनासाठी पद्धती, पिकांसाठी योग्य खतांचा वापर कसा करावा,फळ बागांची लागवड व ईतर नैसर्गिक आपत्तीची काळजी कशी घ्यावी या साठी मार्गदर्शन करण्याच्या कृषी कन्यांचा प्रयत्न असणार.या ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमाकरिता आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस एस पोतदार, कार्यक्रम प्रभारी डॉ.आर.वी महाजन, कार्यक्रम समन्वयक डॉ.आर तायडे, कार्यक्रम अधिकारी डॉ.एम.एम.पातोंड, डॉ.एस ईमडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. जामगांव (बू.) येथे आगमन झालेल्या कृषी कन्यांमधे निकिता पिंपळकर,अंजली शेरकी,राधा राखडे,मानसी सरवे, आकांशा रोगे,बाशू पेटकर आणि धनश्री राठोड यांचा समावेश होता.यावेळी गावातील शेतकरी व ग्रामस्थ भरपूर संख्येने उपस्थित होते.



# पुलगावचे नगरपरिषदने वाढीव मालमत्ता कर लवकरात लवकर स्थगित व रद्द न केल्यास आमरण उपोषण

**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील नगरपरिषद मार्फत वर्ष २०२४-२५ ते २०२७-२८ वाढीव मालमत्ता कराचे बिल मालमत्ता धारकांना देण्यात आले आहे.त्यामध्ये मालमत्ताधारकांना १५०-२०० पट कर वाढ लावून देण्यात आलेली आहे.पुलगाव हे अविकसित गाव असून यामध्ये बेकारीची भारी मोठी समस्या आहे.दैनंदिन जीवनामध्ये रोजगार उपलब्ध होत नसल्याने पुलगावात आर्थिक मंदी आहे . या पूर्वी सुध्दा पुलगांवकर नागरिकांचे मालमत्तेवर 'अ'व 'ब' श्रेणी चे कराचे दर लावण्यात आले होते.परंतु महाराष्ट्र नगरपरिषदा , नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ चे कलम १०५(२) अनुसार नगरपरिषद क्षेत्रातील इमारती, जमीन च्या अथवा तिच्या भागाच्या वापरकर्ते च्या निरनिराळ्या प्रवर्गा करिता कराचे दर निश्चित करण्यात आले पाहिजे.पण अशी मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली नाही.तसेच नगरपरिषद पुलगावने उत्पन्न वाढविण्यासाठी साठी व्यापारी संकुल बांधले आहे व व्यापाऱ्यांना भाड्याने दिले आहे व हे व्यापारी संकुल नगरपरिषदचे मालकी हक्काचे असतांनाही या मालमत्तेवर कर लावून त्यावर दोन टक्के दराने दंडनीय व्याज लावून भाड्यापेक्षा अस्मानी सुलतानी थकबाकी आकारणी केली आहे.महाराष्ट्र नगरपरिषदा , नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५चे कोणत्याही कलमात नमूद नाही आहे. शिवाय कोरोना काळात व्यापार एक वर्ष बंद असतांना सुध्दा दंडनीय व्याज व मालमत्ता कर वगळण्यात आला नाही.शिवाय महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ चे कलम १०७अनुसार 'क' श्रेणी नगरपरिषद कलम१०५ चे पोट कलम (१)व (२)मधील कोणते ही कर लावून शकत नाही.सध्या नगरपरिषद कार्यरत नाही परंतु मुख्याधिकारी यांना आमसभा, स्थायी सभा व मुख्याधिकारीचे अधिकार आहे.

जर नगरपरिषद नागरिकांचे शोषण करत असेल तर




समस्त पुलगांवकर रस्त्यावर येऊन तीव्र आंदोलन करतील .प्रत्येक टॅक्स मध्ये शिक्षण उपकर २५० आणि विशेष शिक्षण गट २०० आणि नगरपरिषद मधील जे त्यांच्या हद्दीतील स्कूल आहे. तेथे विद्यार्थी शून्य मग शिक्षण कर कसले? शाळा बेवारस झालेल्या आहे. परंतु आता नागरिकांना लुटून शोषण करण्याची तयारी नगरपरिषद द्वारा केली जात आहे याकरिता भीम आर्मी आणि समस्त पुलगाव करांचा तीव्र विरोध आहे. निवेदन देऊन प्रस्ताव स्थगितीची मागणी भीम आर्मी द्वारा करण्यात येत आहे स्थगिती न केल्यास दिनांक १ जुलै २४ पासून कधीही आमरण उपोषण करणार याची दक्षता नगरपरिषद मुख्य अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालय आणि शासनाने घ्यावे कायदा सुव्यवस्था बिघडल्यास समस्त जिल्हा प्रशासन जबाबदार राहणार असल्याचे म्हटले आहे.निवेदन पुलगाव नगरपरिषद, पोलीस उपविभागीय कार्यालय. पोलीस स्टेशन पुलगाव ,तहसील कार्यालय , येथे देण्यात आले यावेळेस उपस्थित भीम आर्मी विदर्भ प्रमुख अंकुश कोचे यांच्या नेतृत्वात.शेख मोहम्मद. शब्बीर खान. मोहन कोरिया . गुलाब पठाण. प्रभु वनकर .अनिल बत्रा. ओम पंजवानी .धर्मेंद्र अंबादे. ज्योती नगराडे .यश बोरकर. शाहरुख सय्यद .प्रशांत कोचे .इत्यादी उपस्थित होते.

# पर्यावरण संवर्धनासाठी खेमजई वासियांचा पुढाकार नवीन पिढीसाठी एक आदर्श-जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे

## सीड बॉल तयार करून विविध प्रजातीची लागवड;भजन दिंडी व विद्यार्थी यांचे प्रचार प्रसार







**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील खेमजई येथे दिनाक १६ जून रोजी पर्यावरण संवर्धनासाठी सीड बॉल तयार करून वृक्ष लागवड करण्याचा अनोखा प्रयोग राबविण्यात आला. यासाठी खेमजई वासियांनी घेतलेला पुढाकार हा नवीन पिढीसाठी एक आदर्श असल्याचे प्रतिपादन याप्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी केले.

खेमजई येथे पशुधन अधिकारी म्हणून कार्यरत डॉ.अघडते यांनी वृक्ष लागवड करण्यासाठी बीज गोळे तयार करून लागवड करणे हा नाविन्यपूर्ण उपक्रम मांडला. सदर संकल्पना ग्राम पंचायत, विकास ग्रुप व जिल्हा परिषद शाळा यांचेशी चर्चा करून राबविण्याचा निर्णय घेतला. शालेय विद्यार्थ्यांमार्फत बीज संकलनासाठी प्रति बी ऐक रुपया प्रमाणे आंबा, चिंच, कवठ, करंज यासारख्या प्रजातीचे २ हजार बीज गोळा केले.दिनाक १३ जून २०२४ रोजी जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी व शिक्षक, ग्राम पंचायत पदाधिकारी, विकास ग्रुप , महिला बचत गट, गुरुदेव सेवा मंडळ या सर्वांनी शेण माती पासून ५ हजार सीड बॉल तयार केले.

तयार केलेले सीड बॉल गावाच्या हद्दीतील जंगलात लागवड करण्यासाठी दिनाक १६ जून २०२४ रोजी गाव ते कर्तबशहा वली टेकडी ३ किमी अंतर भजन दिंडी व विद्यार्थी रॅली काढण्यात आली. त्या दरम्यान वृक्ष लागवड विषयक प्रचार प्रसार करण्यात आला. या दिंडीत गावातील महिला व पुरुष भजन मंडळ, विविध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते, ग्राम पंचायत पदाधिकारी, सर्व कर्मचारी , महिला बचत गटाच्या महिला, मुले मुली, युवा वर्ग, मनरेगा मजूर, ग्रामस्थ मंडळी उस्फूर्तपणे मोठ्या संख्येने सहभागी होते. सीड बॉल लागवड करण्यापूर्वी टेकडी परिसरात सरपंच मनीषा चौधरी यांचे अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेण्यात आला.त्यावेळी प्रामुख्याने शिवसेना जिल्हा प्रमुख(उबाठा )मुकेश जिवतोडे वन परिक्षेत्र अधिकारी सतीश शेंडे, विकास ग्रुप चे मार्गदर्शक डॉ.प्रमोद गंपावार, माजी सभापती....कन्हैयालाल... जयस्वाल, बंडू डाखरे माजी सभापती राजू चिकटे, खेमजई येथिल सरपंच मनीषा चौधरी,माजी सभापती छोटूभाऊ शेख, अरुण चौधरी, किशोर डुकरे, कृषी विकास संस्थेचे आशिष अहिर,इत्यादी उपस्थित होते.कार्यक्रमात अभिनव कल्पना मांडून साकार करणाऱ्या डॉ.सतीश अघडते यांचा मान्यवरांचे हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. उपक्रम यशस्वितेसाठी काम केलेल्या विविध सामजिक संघटनांचा गौरव करण्यात आला. उपक्रम यशस्वी करण्यासाठी रमेश चौधरी, विश्वनाथ तुराणकर, विलास चौधरी, शंकर धोत्रे, गोपाल राठोड, वैभव चौधरी ईश्वर हजारे, रोशन हजारे इत्यादीनी सहकार्य केले.याप्रसंगी मान्यवरांचे भाषणे झाली त्यामधे खेमजई गावात कामात काम करणारे कर्मचारी , ग्राम पंचायत कमिटी, विविध संघटना व ग्रामस्थ,जिल्हा परिषद शिक्षक यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपसरपंच चंद्रहास मोरे, संचालन डॉ.सतीश अघडते यांनी केले तर आभार सहाय्यक शिक्षक संजू जांभूळे यांनी केले. कार्यक्रमानंतर जंगल परिसरात विद्यार्थी व पाहुणे , ग्रामस्थ महिला यांनी सीड बॉल लागवड करण्यात आली. वृक्ष लागवडीसाठी खेमजई येथे राबविण्यात आलेला उपक्रम नाविन्यपूर्ण व प्रभावी असल्याने सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# घुग्घुस शहरातील सर्व सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करा-विवेक बोढे

**घुग्घुस । प्रतिनिधी**

शहरातील सर्व सार्वजनिक शौचालयाची तत्काळ दुरुस्ती करा अशी मागणी भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांनी न. प. चे मुख्याधिकारी जितेंद्र गादेवार यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.घुग्घुस शहरातील प्रत्येक प्रभागात नागरिकांसाठी सार्वजनिक शौचालय निर्माण करण्यात आले आहे. परंतु अनेक शौचालयाच्या सिटांना मुख्य टाकीसोबत जोडण्यात आले नाही.त्यामुळे ते नागरिकांच्या वापरात आले नाही. काही शौचालयामध्ये पाण्याची व्यवस्था मुबलक प्रमाणात करण्यात आली होती आणि ते सुरु ही झाले होते. परंतु आता पाईपलाईन खराब झाली आहे त्यामुळे ते शौचालये अस्वच्छतेमुळे बंद पडली आहे.अनेक शौचालयाजवळ घाण कचरा



साचला आहे. शहरातील अनेक सार्वजनिक शौचालये बंद अवस्थेत असल्याने महिलांना व नागरिकांना याचा नाहकत्रास सहन करावा लागत आहे. ही समस्या लक्षात घेत भाजपाचे जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांनी शिष्टमंडळासह न. प. चे मुख्याधिकारी जितेंद्र गादेवार यांची न. प. कार्यालयात भेट घेतली व चर्चा केली आणि निवेदन दिले.यावेळी भाजपाचे संतोष नुने, शाम आगदारी, किशोर घनकसार, सचिन बोन्डे, इर्शाद राईन, उत्तम उपरे, शंकर कटकुरवार, सुनील वावरे, विक्की यादव, राहुल मेश्राम, काशी यादव, अजय साहू, अक्षय यादव सुनील कोहाड, संतोष लोखंडे आदींची उपस्थिती होती.

# राष्ट्रवादी काँग्रेसचा जनआक्रोश मोर्चा

**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील रेल्वे क्रॉसिंग जवळील उड्डाणं पुलाचे (आर ओ बी)बांधकाम तसेच नाचणगाव रोड चे बांधकामात हयगय होत असून अत्यंत मंद गतीने कार्य सुरू आहे. उपरोक्त दोन्ही उडानपुल,रोड व नाचणगाव रस्त्याचे बांधकाम खोदून ठेवल्यामुळे नागरिकांना ये- जा करण्याकरिता अत्यंत धोकादायक त्रास होत असून अनेक समस्याचा सामना करावा लागत आहे. यासंबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन सुद्धा दिले. संबंधित विभागाकडे पाठपुरावा केलेला आहे. परंतु ही बाब गांभीर्याने न घेता त्याकडे दुर्लक्ष केल्या गेले. म्हणून दि. १८ जुनला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी विधानसभा अध्यक्ष तुषार वाघ यांच्या नेतृत्वात जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले. यावेळी संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम विभागाशी चर्चा करून योग्य तो तोडगा



काढण्यात आला.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वर्धा जिल्हा सरचिटणीस अजहर खान, वर्धा जिल्हा उपाध्यक्ष सुमित शिरभाते, देवळी तालुका अध्यक्ष राजेश बढे, सामाजिक कार्यकर्ते हिटलर हुमणे, देवळी शहर अध्यक्ष अजहर खान, तालुका कार्याध्यक्ष अजय घोडेस्वार, सैय्यद दाऊद, युवक राष्ट्रवादी शहर अध्यक्ष गुरुबच्चनसिंग बावरी,जितु हक, अजय यादव, सैफ अली शेख तसेच असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# पतंजली परिवार तर्फे आंतरराष्ट्रीय योग दिवस

**पुलगाव । प्रतिनिधी**–आंतरराष्ट्रीय योग दिवस हा दरवर्षी २१ जुन रोजी जगभरात साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांनी योग दिवसाला मान्यता दिली आहे.भारताचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जुन हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा करण्यात यावा असा प्रस्ताव मांडला होता आणि या प्रस्तावाला १७५ देशांच्या प्रतिनिधींनी पाठिंबा दिला.पुलगांव शहरात दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा पतंजली योग परिवार, पुलगांव तर्फे आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहाने साजरा करण्यात येणार आहे. शुक्रवार दिनांक २१ जुन २०२४ रोजी योग भवन, तहसील कार्यालय जवळ आठवडी बाजार रोड, पुलगांव येथे सकाळी ५:३० ते ७:०० वाजेपर्यंत ब्रम्ह-मुहूर्तावर योग दिवस साजरा करण्याचे ठरविले आहे. पुलगांव-नाचणगांव शहरातील सर्व योग प्रेमींना, योग शिक्षक, पदाधिकारी यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे,अशी विनंती पतंजली तालुका प्रमुख वसंत वरभे आणि महेश आहुजा यांनी केली आहे.

# सांडपाण्याच्या व्यवस्थेसाठी माजी सैनिकाच्या कुटुंबाचा टाहो

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिय आर के हायस्कूल परिसरातील मुख्य रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नालीचे बांधकाम करण्यात आले. पण त्याला झाकण व्यवस्थितरित्या न लावल्यामुळे तसेच भगदाड पडल्यामुळे लोखंडी रॉड बाहेर आले आहे. नालीचे बांधकाम व्यवस्थित झाले नसल्यामुळे सांडपाणी एकाच जागी साचून राहते व या सांडपाण्यावर मच्छर निर्माण होतात.त्यामुळे साथीचे आजार पसरतात. माजी सैनिक भगवंतराव होले यांच्या कुटुंबाने अनेक ठिकाणी अनेक तक्रारी करून सुद्धा कोणतीच दखल घेण्यात आली नाही.

माजी सैनिकांच्या पत्नी चंद्रकला भगवंतराव होले यांचे नाचणगाव मार्गावर घर आहे.त्यांच्या घराशेजारी नाला आहे. गत दोन वर्षांपासून सुरु असलेल्या पुलगाव नाचणगाव मार्गाच्या सौंदर्यकरणाचे कामामध्ये या भागातील काम मे २३ मध्ये पुर्ण झाले. परंतु नालीवरील झाकण व्यवस्थित लावले नसल्याने जाता येता पायाला अडकून बरेच जण पडतात. माजी सैनिक पत्नी बऱ्याच वेळा पडल्या. याठिकाणी रपट्याला भगदाड पडले आहे. त्यातून लोखंडी रॉड बाहेर आले आहे. ते जाता येता लागतात. सदर बाबीची मौखिक तक्रार कंत्राटदार, सुपरवायझर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांना वारंवार केलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पोर्टलवर चार-पाच वेळा तक्रार टाकलेली आहे. पण कोणतीही दखल घेण्यात आली नाही. नाल्याचे बांधकाम व्यवस्थित न झाल्यामुळे सांडपाणी नाल्यातच साचून राहते. त्यामुळे येथे मच्छरांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे परिसरामध्ये साथीचे रोग पसरत आहे. मागील वर्षी चंद्रकलाबाई होले यांचा मुलगा यास डेंगू झाला व तो दवाखान्यात भरती होता.या वर्षी सुद्धा पावसाळ्याची सुरुवातीला तशीच स्थिती निर्माण झाली आहे.याबाबत संबंधित विभागाला वारंवार सूचना देऊन तसेच अधिकाऱ्यांना भेटून सुद्धा तोडगा निघाला नाही. लष्करी सेवा देणाऱ्या माजी सैनिकाच्या कुटुंबाच्या प्रश्नाची दखल शासन दरबारी केव्हा घेण्यात येईल. असा प्रश्न निर्माण झाला आहे. गेले कित्येक महिन्यापासून माजी सैनिकाचे कुटुंब आपल्या सोबत परिसरातील सर्व कुटुंबाचे आरोग्याचे हित जोपासण्याच्या दृष्टीने शासकीय उंबरठा भिजवत आहे. त्यांचा टाहो कोणी ऐकेल का. हा सवाल आहे.



# नेत्रदान मोहीम लोकचळवळ होण्याची गरज-डॉ.प्रफुल्ल खुजे

## वरोरा उपजिल्हा रुग्णालयात दृष्टिदान सप्ताह साजरा

**वरोरा । प्रतिनिधी**

'अंधत्व ' ही सार्वजनिक आरोग्याच्या समस्येपैकी मुख्य समस्या असल्याने अंधारलेल्या व्यक्तींच्या आयुष्यात प्रकाश पाडण्यासाठी देशात ' मरणोत्तर नेत्रदान ' ही मोहीम लोकचळवळ होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन वरोरा उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रफुल्ल खुजे यांनी येथे केले. सुप्रसिद्ध नेत्र विशारद डॉ.आर ए. भालचंद्र याच्या स्मृतीप्रीत्यर्थ उपजिल्हा रुग्णालय, वरोरा येथे आयोजित ' दृष्टिदान सप्ताह ' कार्यक्रमात अध्यक्षीय मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून वरोरा उपजिल्हा रुग्णालयाचे नेत्र शल्यचिकित्सक डॉ. वंदेश शेंडे, डॉ. स्नेहाली शिंदे, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतीक दारुंडे, नेत्र अधिकारी विवेक मेश्राम, अधिसेविका वंदना बरडे, समाज कार्यकर्ता तथा ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र मर्दाने आदी प्रामुख्याने उपस्थित होते.डॉ. खुजे पुढे म्हणाले की, नेत्रदानाचे महत्त्व लक्षात घेता प्रत्येक सुजाण नागरिक नेत्रदान करण्यास स्वयंस्फूर्तीने पुढे आल्यास त्याचा फायदा जगातील नेत्रहीन व्यक्तीला निश्चितच होऊ शकतो. वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या उल्लेखनीय योगदानामुळे नेत्रचिकित्सा शस्त्रक्रियेत राज्यात चंद्रपूर जिल्हा अव्वल ठरला असल्याचे त्यांनी अभिमानाने नमूद केले.डॉ. शेंडे यांनी नेत्रदानाचे महत्त्व विशद करीत सांगितले की, जागतिक आरोग्य संघटनेनुसार ' कार्निया ' संबंधित आजार हा मोतीबिंदू आणि काचबिंदू नंतर अंधत्वाच्या मुख्य कारणांपैकी एक आहे. संगणक, मोबाईल व अन्य तंत्रज्ञानाचा वापर जपून करावा, असा सल्ला देत डोळ्यांची योग्य निगा न राखल्याने आजाराचे प्रमाण वाढले आहे, असे ते म्हणाले. जगात अंधांच्या संख्येत वाढ झाल्याने नेत्रांची मागणी वाढली असून त्या तुलनेत नेत्रदात्यांची संख्या खूपच कमी आहे,



असे त्यांनी नमूद केले. नेत्रदानासाठी इच्छुक व्यक्तींनी जवळच्या रुग्णालयात संपर्क साधून नोंदणी करावी, असे आवाहनही त्यांनी केले. डॉ. शिंदे म्हणाल्या की, देशात जवळपास ६० लाख व्यक्ती दृष्टिहीन असून स्वैच्छिक नेत्रदान करणारे फक्त ४५ हजार आहेत. १० जून या आंतरराष्ट्रीय दृष्टिदान दिनाच्या निमित्ताने दृष्टिदानाचे उद्दिष्ट व नेत्रदानाने महत्त्व, याबद्दल जनजागृती करुन नागरिकांना दृष्टिदानासाठी प्रवृत्त करणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.प्रास्ताविकात वंदना बरडे यांनी नेत्रदान, अवयव दान, रक्तदान इ. बद्दलचे महत्त्व विशद करताना यापूर्वीच त्यांनी स्वतः नेत्रदान, देहदानचा फार्म भरला असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.यावेळी आरोग्य सहाय्यक गुलाब नागोसे, परिसेविका इंदिरा कोडापे, सरस्वती कापटे, रुईकर, तनिष्का खडसाने, नेहा इंदूरकर, लक्ष्मीकांत टाले, कुंदा मडावी, चंदा काळे, पाल, राजपूत, उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचारीवृंद, नेत्र रुग्ण, सुजाण नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सूत्रसंचालन प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी सोनाली रासपायले यांनी तर आभार प्रदर्शन नेत्र अधिकारी दीपक अंबादे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपजिल्हा रुग्णालयाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .